दि.१.२.२००९ रोजी गडचिरोली जिल्हयात मरकेगाव जंगलात झालेल्या नक्षलवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान व इतर सोयी सवलती देण्याबाबत.

16 MAR 2009

## महाराष्ट्र शासन
## गृह विभाग

शासन निर्णय क्र. पीडब्ल्यूएफ-०२०९/प्र.क्र.११० / पोल-७

मंत्रालय, मुंबई. ३२. दि. ९ मार्च, २००९.

**संदर्भ:-** १) शासन निर्णय क्रमांक पीडब्ल्यूएफ-१००३/प्र.क्र.८/पोल-७,दि. १६ मार्च, २००४

२) शासन निर्णय क्रमांक पीडब्ल्यूएफ-१००३/प्र.क्र.८/पोल-७,दि. ६ जुलै, २००४

३) शासन निर्णय क्रमांक पीडब्ल्यूएफ-१००८/प्र.क्र.८/पोल-७.दि. २९ नोव्हेंबर, २००८

४) शा.नि. महसुल व वन विभाग क्र: डिएमयू -२००८/प्र.क्र. ३९९/ डीएम-१,दि. १.१२.२००८.

५) शासन निर्णय क्रमांक पीडब्ल्यूएफ०२०९/प्र.क्र.१०७/पोल-७,दि.०६ फेब्रुवारी,२००९

६) शासन ज्ञापन वित्त विभाग क्र.आकनि-११.९/९३/अर्थसंकल्प-११ दि.४.३.२००९

**प्रस्तावना :-** दिनांक १.२.२००९ रोजी गडचिरोली जिल्हयातील मरकेगांव जंगलाजवळ नक्षलवाद्यांनी पोलीस दलावर केलेल्या हल्ल्यामध्ये १५ पोलीस अधिकारी/कर्मचारी शहीद झाले. सदर घटनेच्या अनुषंगाने नक्षलविरोधी कारवाईत/नक्षलवादी हल्ल्यात मृत झालेल्या पोलीस अधिकारी कर्मचा-यांच्या कुटुंबियांना विशेष मदत व इतर सोयी सवलती देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**दिनांक १.२.२००९ रोजी गडचिरोली जिल्हयातील मरकेगांव जंगलाजवळ नक्षलवाद्यांनी पोलीस दलावर केलेल्या हल्ल्यामध्ये १५ पोलीस अधिकारी / कर्मचारी शहीद झाले. संदर्भ क्रमांक ५येथील दि. ०६.०२.२००९ च्या शासन निर्णयान्वये सदर नक्षलविरोधी कारवाई/नक्षलवादी हल्ल्यात शहिद झालेल्या पोलीसांच्या कुटुंबियांना विशेष मदत देण्याबाबत व इतर सवलतीबाबत शासन आदेश निर्गमित केलेला आहे. त्या अनुषंगाने उपरोक्त नक्षलविरोधी कारवाईत/नक्षलवादी हल्ल्यात मृत झालेल्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या कुटुंबियांना प्रत्येक मृत कर्मचाऱ्यामागे रु.२५,००,०००/- लक्ष याप्रमाणे मृत झालेल्या १५ पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या कुटुंबियाकरीता रु. ३,७५,००,०००/- (रुपये तीन कोटी पंच्याहत्तर लाख फक्त) इतक्या रकमेचे सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नियंत्रण अधिकारी | लेखाशीर्ष |
|---|---|---|
| १) | पोलीस अधिक्षक, गडचिरोली (ग्रामीण) (रु ३.७५ कोटी) | १)मुख्य लेखाशीर्ष "२०५५- पोलीस" अंतर्गत लेखाशीर्ष "(००) ११३-पोलीस कर्मचारी वर्ग यांचे कल्याण (००) (०४) कर्तव्य बजावीत असतांना जखमी अथवा मृत झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना व त्यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान (२०५५ ०२९३) योजनेतर ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)" |

२. यासाठी होणारा खर्च मागणी क्र.बी-१, मुख्य लेखाशीर्ष "२०५५- पोलीस" अंतर्गत लेखाशीर्ष "(००) ११३-पोलीस कर्मचारी वर्ग यांचे कल्याण (००) (०४) कर्तव्य बजावीत असतांना जखमी अथवा मृत झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना व त्यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान (२०५५ ०२९३) योजनेतर ३१ सहाय्यक अनुदाने

(वेतनेतर)" या लेखाशिर्षाखाली प्रथमत: शासन ज्ञापन वित्त विभाग क्र. आकनि-११.०९/८३/अर्थसंकल्प-११ दि. ४.३.२००९ अन्वये मंजुर करण्यात आलेल्या रु.३.७५ कोटी ( रु. तीन कोटी पंच्याहत्तर लक्ष फक्त) आकस्मिकता निधी अग्रीमातुन भागविण्यात यावा.

३. या सबंधीचे देयके कोषागारात सादर करतांना त्यावर लाल शाईने सदर खर्च आकस्मिकता निधीतून करण्यात आला आहे, अशी नोंद घेण्यात यावी व सदर प्रकरणी पूरक अनुदान प्राप्त झाल्यावर ती मागणी बी-१ मुख्य लेखाशीर्ष "२०५५- पोलीस" अंतर्गत लेखाशीर्ष "(००) ११३-पोलीस कर्मचारी वर्ग यांचे कल्याण (००) (०४) कर्तव्य बजावीत असतांना जखमी अथवा मृत झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना व त्यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान (२०५५ ०२९३) योजनेतर ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशीर्षाखाली अंतिमत: खर्ची टाकण्यात यावा. रु.३.७५ कोटी (रुपये तीन कोटी पंच्याहत्तर लक्ष फक्त) मंजूर केलेला अग्रिम हा पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना सानुग्रह अनुदान देण्याकरिता आहे.

४. पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांनी वरील मंजुरीप्रमाणे आकस्मिकता निधी अग्रिम रकमेतून खर्च करण्यासाठी देयके सादर करण्या संदर्भात पुढील सूचना काटेकोरपणे पाळण्याबाबत संबंधितांना कळवावे.

(एक) आकस्मिकता निधीतून खर्च करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडे रक्कम सुपूर्द करण्यासंबंधीच्या आदेशात आगाऊ रक्कमेतून खर्च करतांना सादर करण्यात येणाऱ्या देयकावर "आकस्मिकता निधी अग्रिम, शासन ज्ञापन वित्त विभाग क्र. आकनि-११.०९/८३/अर्थसंकल्प-११ दि. ४.३.२००९ संगणक सांकेतांक ८०००४४५९ अन्वये मंजूर" असे लाल शाईने लिहावे, अशी सूचना आदेशात अंतर्भूत करावी व ही सूचना लाल शाईने अधोरेखित करावी.

(दोन) आकस्मिकता निधी अग्रिम रकमेतून खर्च करण्यासाठी वेगळी देयके सादर करावीत.

(तीन) देयकावर जोडलेल्या संगणक चिठ्ठीवर अर्थसंकल्प शीर्षाचा कोड नंबर लिहिण्यात यावा.

(चार) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.सीएनएफ-१०८६/१५३/अर्थसंकल्प-३, दिनांक २८ ऑगस्ट, १९८६ व क्र.सीएनएफ-१०८६/१४०/अर्थसंकल्प-३, दिनांक २६ एप्रिल, १९८६ अन्वये आकस्मिकता निधीमधील आगाऊ रकमेबाबत दिलेल्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करावे.

(पाच) आकस्मिकता निधी अग्रिमातून करावयाच्या खर्चासंबंधी देयके काढतांना संगणक संकेतांकाचा वापर करावा.

५. पोलीस अधिक्षक,गडचिरोली यांनी वरील मंजुरीप्रमाणे आकस्मिकता निधी अग्रिम खर्च करतांना ज्या कारणासाठी तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे, त्याच कारणासाठी पूर्णपणे खर्च करावी. ते याकरिता पूर्ण जबाबदार राहतील. तसेच सदरहू अग्रिमातून प्रत्यक्ष खर्च केल्याची माहिती त्यांनी शासनास दिनांक ३१.०३.२००९ पूर्वी अवगत करावी.

पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांना विनंती करण्यात येते की, त्यांना मंजूर करण्यात आलेला निधी संबंधित मृत कर्मचारी विवाहीत असल्यास त्याची पत्नी, मुले वा सावत्र मुले आणि दत्तक मुले, अविवाहीत मुली, सावत्र व दत्तक मुली यांच्या नावे स्वतंत्र खाती काढून समप्रमाणात मुदत ठेवीवर जमा करावेत. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृतीवेतन) नियम, १९८२ मधील कलम ११२ अन्वये प्रदान करण्यात येणा-या उपदानाप्रमाणे जर वरील पैकी त्यांच्या कुटुंबातील एकही व्यक्ती हयात नसतील तर विधवा मुली (सावत्र, दत्तक मुली), आई, वडिल, १८ वर्षाखालील भाऊ यात सावत्र भाऊ, अविवाहीत बहीण, विधवा बहीण यात सावत्र बहिणीही तसेच विवाहीत मुली आणि पूर्वी मृत्यू पावलेल्या मुलांचे अपत्य एक किंवा त्याहून अधिक व्यक्ती हयात असतील तर अशा सर्व व्यक्तींना समान हिश्यात मुदत ठेवीवर जमा करावेत व व्याजाकरीता त्यांची वैयक्तिक स्वतंत्र खाती काढण्यात यावीत. जेणेकरुन मुदत ठेवीवरील व्याज संबंधितांना उपलब्ध होऊ शकेल. या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्यात यावी व तसे शासनास अवगत करावे.

६.	हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.११३/०९ व्यय-७ , दिनांक २१.२.२००९ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( सु. बा. तुंबारे )
कार्यासन अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति,
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
पोलीस अधिक्षक, गडचिरोली
महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), मुंबई (प्रत्येकी पाच जादा प्रतीसह)
महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), नागपूर (प्रत्येकी पाच जादा प्रतीसह)
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई. (दोन जादा प्रतीसह)
सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय भवन. ५ वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई-३२ (दोन जादा प्रतीसह)
वित्त विभाग/अर्थसंकल्प-३/अर्थसंकल्प-१४/व्यय-७
जिल्हा कोषागार अधिकारी, गडचिरोली
गृह विभाग (बीयुडी-१)/निवड नस्ती (कार्यासन पोल-७)

दि.६.४.२००९ व दि २१.५.२००९ रोजी गडचिरोली जिल्ह्यातील दोन वेगवेगळ्या नक्षलवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान व इतर सोयी सवलती देण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन
## गृह विभाग

शासन निर्णय क्र. पीडब्ल्यूएफ- ०५०९ /प्र.क्र-३९६./ पोल-७
मंत्रालय, मुंबई. ३२. दि. ३ जुलै, २००९.

**संदर्भ:-** १) शासन निर्णय क्रमांक पीडब्ल्यूएफ-१००३/प्र.क्र.८/पोल-७,दि. १६ मार्च, २००५
२) शासन निर्णय क्रमांक पीडब्ल्यूएफ-१००३/प्र.क्र.८/पोल-७,दि. ६ जुलै, २००५
३) शासन निर्णय क्रमांक पीडब्ल्यूएफ-१००८/प्र.क्र.८/पोल-७,दि. २९ नोव्हेंबर, २००८
४) शा.नि. महसुल व वन विभाग क्र: डिएमयू -२००८/प्र.क्र. ३९९/ डीएम-१,दि. १.१२.२००८.
५)शासन निर्णय क्रमांक पीडब्ल्यूएफ०२०९/प्र.क्र.१०७/पोल-७,दि.०६ फेब्रुवारी,२००९
६) पोलीस महासंचालक कार्यालयाचे पत्र क्र. पोमस/२८-अे/४९३७/नु भ (समाजविघातक)/४७/०८ दिनांक. २७.५.२००९.
७)पोलीस महासंचालक कार्यालयाचे पत्र क्र. पोमस/२८-अे/४९३७/नु भ (समाजविघातक)/४७/०८ दिनांक. २८.५.२००९.
८) पोलीस महासंचालक कार्यालयाचे पत्र क्र. पोमस/२८-अे/४९३७/नु भ (समाजविघातक)/४७/०८ दिनांक. २१.५.२००९.

**प्रस्तावना :-** दि. ६.४.२००९ व दि.२१.५.२००९ रोजी गडचिरोली जिल्हयात अनुक्रमे धानोरा परिसरातील मुंगनेर जंगल परिसरात व धानोरा पोलीस स्टेशन अंतर्गत मौजा येरकड ते मुरुमगाव रोडवर हत्तीगोटा जंगल भागात झालेल्या नक्षलवादी हल्ल्यात एकूण १९ पोलीस अधिकारी/कर्मचारी शहीद झाले आहेत. सदर घटनेच्या अनुषंगाने नक्षलविरोधी कारवाईत/नक्षलवादी हल्ल्यात मृत झालेल्या पोलीस अधिकारी / कर्मचा-यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** दि.६.४.२००९ व दि.२१.५.२००९ रोजी गडचिरोली जिल्हयात अनुक्रमे धानोरा परिसरातील मुंगनेर जंगल परिसरात व धानोरा पोलीस स्टेशन अंतर्गत मौजा येरकड ते मुरुमगाव रोडवर हत्तीगोटा जंगल भागात झालेल्या नक्षलवादी हल्ल्यात एकूण १९ पोलीस अधिकारी/कर्मचारी शहीद झाले आहेत संदर्भ क्रमांक ५येथील दि. ०६.०२.२००९ च्या शासन निर्णयान्वये सदर नक्षलविरोधी कारवाई/नक्षलवादी हल्ल्यात शहिद झालेल्या पोलीसांच्या कुटुंबियांना विशेष मदत देण्याबाबत व इतर सवलतींबाबत शासन आदेश निर्गमित केलेला आहे.सदर आदेशान्वये प्रत्येक शहीद पोलीसांच्या कुटुंबियांना रु. २५ लक्ष इतक्या रकमेचे सानुग्रह अनुदान देय आहे. तथापि दि. ६ एप्रिल, २००९ रोजी झालेल्या नक्षलवादी हल्ल्यात शहीद झालेल्या सोबतच्या **प्रपत्र "अ"** येथील ३ पोलीस कर्मचा-यांच्या कुटुंबियांना पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई. या कार्यालयाच्या संदर्भ क्र.७ येथील दि. २८.५.२००९ च्या पत्रान्वये प्रत्येकी रु.९ लाख इतक्या रकमेचे सानुग्रह अनुदान मंजूर केले असल्याने या आदेशान्वये वरील ३ पोलीस कर्मचा-यांच्या कुटुंबियांना उर्वरित प्रत्येकी १६ लक्ष इतकी रक्कम मंजूर करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने उपरोक्त नक्षलविरोधी कारवाईत/नक्षलवादी हल्ल्यात मृत झालेल्या एकुण १९ पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या कुटुंबियांना रु. ४,४८,००,०००/- (रुपये चार कोटी अठ्ठेचाळीस लक्ष फक्त) इतक्या रकमेचे सानुग्रह अनुदान

मंजूर करण्यात येत आहे. शहीद पोलीसांची यादी व त्यांना द्यावयाच्या सानुग्रह अनुदानाच्या रकमेचा तपशिल सोबतच्या प्रपत्र "अ" मध्ये देण्यात आला आहे.

| अ.क्र. | नियंत्रण अधिकारी | लेखाशीर्ष |
|---|---|---|
| १) | पोलीस अधिक्षक, गडचिरोली (रु४.४८ कोटी) | १)मुख्य लेखाशीर्ष "२०५५- पोलीस" अंतर्गत लेखाशीर्ष "(००)११३-पोलीस कर्मचारी वर्ग यांचे कल्याण (००) (०४) कर्तव्य बजावीत असतांना जखमी अथवा मृत झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना व त्यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान (२०५५ ०२९३) योजनेतर ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) |

२. यासाठी होणारा खर्च मुख्य लेखाशीर्ष "२०५५- पोलीस" अंतर्गत लेखाशीर्ष "(००)११३-पोलीस कर्मचारी वर्ग यांचे कल्याण (००) (०४) कर्तव्य बजावीत असतांना जखमी अथवा मृत झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना व त्यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान (२०५५ ०२९३) योजनेतर ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर)या लेखाशिर्षाखाली प्रथमत: शासन वित्त विभाग क्र. आकनि-११.०९/११/अर्थसंकल्प-११ दि. १ जुलै, २००९. अन्वये मंजुर करण्यात आलेल्या रु.४.४८ कोटी ( रु. चार कोटी अठ्ठेचाळीस लक्ष फक्त) इतक्या रकमेच्या आकस्मिकता निधी अग्रीमातुन भागविण्यात यावा.

३. या सबंधीची देयके कोषागारात सादर करतांना त्यावर लाल शाईने "सदर खर्च आकस्मिकता निधीतून करण्यात आला आहे," अशी नोंद घेण्यात यावी व सदर प्रकरणी पूरक अनुदान प्राप्त झाल्यावर ती मागणी बी-१ ) मुख्य लेखाशीर्ष "२०५५- पोलीस" अंतर्गत लेखाशीर्ष "(००)११३-पोलीस कर्मचारी वर्ग यांचे कल्याण (००) (०४) कर्तव्य बजावीत असतांना जखमी अथवा मृत झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना व त्यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान (२०५५ ०२९३) योजनेतर ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशीर्षाखाली अंतिमत: खर्ची टाकण्यात यावी. रु.४.४८ कोटी (रुपये चार कोटी अठ्ठेचाळीस लक्ष फक्त)इतक्या रकमेचा मंजूर केलेला अग्रिम हा पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना सानुग्रह अनुदान देण्याकरिता आहे.

४. पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांनी वरील मंजुरीप्रमाणे आकस्मिकता निधी अग्रिम रक्मेतून खर्च करण्यासाठी देयके सादर करण्या संदर्भात पुढील सूचना काटेकोरपणे पाळण्याबाबत संबंधितांना कळवावे.

(एक) आकस्मिकता निधीतून खर्च करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडे रक्कम सुपूर्द करण्यासंबंधीच्या आदेशात आगाऊ रक्कमेतून खर्च करतांना सादर करण्यात येणाऱ्या देयकावर "आकस्मिकता निधी अग्रिम, शासन ज्ञापन वित्त विभाग क्रमांक:आकनि-११.०९/ अर्थसंकल्प-११ दिनांक १ जुलै, २००९. संगणक सांकेतांक ८०००४६३७ अन्वये मंजूर" असे लाल शाईने लिहावे, अशी सूचना आदेशात अंतर्भूत करावी व ही सूचना लाल शाईने अधोरेखित करावी.

(दोन) आकस्मिकता निधी अग्रिम रकमेतून खर्च करण्यासाठी वेगळी देयके सादर करावीत.

(तीन) देयकावर जोडलेल्या संगणक चिठ्ठीवर अर्थसंकल्प शीर्षाचा कोड नंबर लिहिण्यात यावा.

(चार) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.सीएनएफ-१०८६/१५३/अर्थसंकल्प-३, दिनांक २८ ऑगस्ट, १९८६ अन्वये आकस्मिकता निधीमधील आगाऊ रकमेबाबत दिलेल्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करावे.

(पाच) आकस्मिकता निधी अग्रिमातून करावयाच्या खर्चासंबंधी देयके काढतांना संगणक संकेतांकाचा वापर करावा.

५. पोलीस अधिक्षक,गडचिरोली यांनी वरील मंजुरीप्रमाणे आकस्मिकता निधी अग्रिम खर्च करतांना ज्या कारणासाठी तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे त्याच कारणासाठी पूर्णपणे खर्च करावी. ते याकरिता पूर्ण जबाबदार राहतील. तसेच सदरहू अग्रिमातून प्रत्यक्ष खर्च केल्याची माहिती त्यांनी शासनास दिनांक ३१.७.२००९ पूर्वी अवगत करावी.

पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांना विनंती करण्यात येते की, त्यांना मंजूर करण्यात आलेला निधी संबंधित मृत कर्मचारी विवाहीत असल्यास त्याची पत्नी, मुले वा सावत्र मुले आणि दत्तक मुले, अविवाहीत मुली, सावत्र व दत्तक मुली यांच्या नावे स्वतंत्र खाती काढून समप्रमाणात मुदत ठेवीवर जमा करावेत. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन)नियम, १९८२ मधील कलम ११२ अन्वये प्रदान करण्यात येणा-या उपदानाप्रमाणे जर वरील पैकी त्यांच्या कुटुंबातील एकही व्यक्ती ह्यात नसतील तर विधवा मुली (सावत्र दत्तक मुली), आई, वडील, १८ वर्षाखालील भाऊ यात सावत्र भाऊ अविवाहीत बहिण, विधवा बहिण यात सावत्र बहीणीही तसेच विवाहीत मुली आणि पुर्वी मृत्यु पावलेल्या मुलांचे अपत्य एक किंवा त्याहून अधिक व्यक्ती हयात असतील तर अशा सर्व व्यक्तींना समान हिश्यात मुदत ठेवीवर जमा कराव्यात व व्याजाकरिता त्यांची वैयक्तिक स्वतंत्र खाती काढण्यात यावीत. जेणेकरुन मुदत ठेवीवरील व्याज संबधितांना उपलब्ध होऊ शकेल. या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्यात यावी व तसे शासनास अवगत करावे.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.३१९/०९ /व्यय-७, दिनांक :-९.६.२००९ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( सु. बा. तुंबारे )

कार्यासन अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति,

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई.

पोलीस अधिक्षक, गडचिरोली

महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), मुंबई (प्रत्येकी पाच जादा प्रतींसह)

महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), नागपूर (प्रत्येकी पाच जादा प्रतींसह)

संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई. (दोन जादा प्रतींसह)

सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई-३२ (दोन जादा प्रतींसह)

जिल्हा व कोषागार अधिकारी, गडचिरोली.

वित्त विभाग/अर्थसंकल्प-३/अर्थसंकल्प-१०/व्यय-७

गृह विभाग (बीयुडी-१)

निवड नस्ती (कार्यासन पोल-७)

## सोबतचे प्रपत्र -"अ"

(I) दि.६ एप्रिल २००९ रोजी गडचिरोली जिल्हयात नक्षलवादी हल्ल्यात शहिद झालेल्या पोलीस कर्मचा-यांची यादी व त्यांच्या कुटुंबियांसाठी मंजुर सानुग्रह अनुदानाचा तपशिल.

| अ.क्र | नाव | पद | दि.१६.३.२००५ व दि.६.७.२००५ च्या शासन निर्णयानुसार पोलीस महासंचालक कार्यालयाच्या दि.२८.५.२००९ च्या पत्रान्वये मंजुर करण्यात आलेली रक्कम (रुपये) | दि.६.२.२००९ च्या शासन निर्णयानुसार शहीदांच्या कुटुंबियांना द्यावयाची व या आदेशानुसार मंजुर उर्वरित रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|
| १ | ज्ञानेश्वर भगवान सेप | पोलीस शिपाई | ९ .०० लक्ष | १६.०० लक्ष |
| २ | गोपीचंद नारायण नैताम | पोलीस शिपाई | ९ .०० लक्ष | १६.०० लक्ष |
| ३ | कालीदास रुषी वड्डे | पोलीस शिपाई | ९ .०० लक्ष | १६.०० लक्ष |
| | | एकूण | २७ लक्ष | ४८.०० लक्ष |

(II) दि. ११ मे, २००९ रोजी गडचिरोली जिल्हयात नक्षलवादी हल्ल्यात शहिद झालेल्या पोलीस कर्मचारी /अधिका-यांची यादी व त्यांच्या कुटुंबियांसाठी मंजुर सानुग्रह अनुदानाचा तपशिल

| अ.क्र | नाव | पद | दि.६.२.२००९ च्या शासन निर्णयानुसार शहीदांच्या कुटुंबियांना द्यावयाची व या आदेशानुसार मंजुर रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | अशोक रामास्वामी अय्यर | पोलीस निरीक्षक | २५.०० लक्ष |
| २ | शांताराम प्रतापराव घोरपडे | पोलीस उपनिरीक्षक | २५.०० लक्ष |
| ३ | भक्तदास वारलुजी शेट्टीवार | स.फौ /७११ | २५.०० लक्ष |
| ४ | हेमराज पतरुजी टेंभूर्णे | पोलीस हवालदार/२४७ | २५.०० लक्ष |
| ५ | सुरेश अवसुजी किरंगे | पोलीस हवालदार/५०५ | २५.०० लक्ष |
| ६ | काशिनाथ वासुदेव रोहणकर | चालक पोना/८२३ | २५.०० लक्ष |
| ७ | गेंदकुवर चैनसिंग फरदिहा | महिला पोना/१८०६ | २५.०० लक्ष |
| ८ | मानिक नेहरु उसेंडी | पोना /१८६० | २५.०० लक्ष |
| ९ | शकुंतला लच्या आलाम | महिला पोना / १८९२ | २५.०० लक्ष |
| १० | शोभा लिंगाजी ताडे | महिला पोना / १७८३ | २५.०० लक्ष |
| ११ | दामोदर आत्माराम नैताम | पो.शि/१००५ | २५.०० लक्ष |
| १२ | सदानंद वासुदेव मडावी | पो.शि /१२४४ | २५.०० लक्ष |
| १३ | संतोष बन्सी दुर्गे | पो.शि /२१६१ | २५.०० लक्ष |
| १४ | विलास वासुदेव मांदाडे | पो. शि/२२२० | २५.०० लक्ष |
| १५ | अल्का वाजोजी गावडे | महिला पो. शि./२३८५ | २५.०० लक्ष |
| १६ | सुनिता बहादुजी कल्लो | महिला पो. शि./२३९३ | २५.०० लक्ष |
| | | एकूण | ४.०० कोटी |

16 OCT 2009

पा. ब. कं., म रा. मुंबई

79086

दि. ८.१०.२००९ रोजी गडचिरोली जिल्हयात लाहेरी जंगलाजवळ नक्षलवादी हल्ल्यात शहीद व जखमी झालेल्या पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान / नुकसान भरपाई देण्याबाबत.

## महाराष्ट्र शासन
## गृह विभाग

शासन निर्णय क्र. पीडब्ल्यूएफ-१००९/प्र.क्र.७३३ / पोल-७
मंत्रालय, मुंबई ३२. दि. १५ ऑक्टोबर, २००९.

**संदर्भ:-** १) शासन निर्णय क्रमांक पीडब्ल्यूएफ-१००३/प्र.क्र.८/पोल-७,दि. १६ मार्च, २००५

२) शासन निर्णय क्रमांक पीडब्ल्यूएफ-१००३/प्र.क्र.८/पोल-७,दि. ६ जुलै, २००५

३) शासन निर्णय क्रमांक पीडब्ल्यूएफ-१००८/प्र.क्र.८/पोल-७,दि. २९ नोव्हेंबर, २००८

४) शा.नि. महसुल व वन विभाग क्र: डिएमयू -२००८/प्र.क्र. ३९९/ डीएम-१,दि. १ डिसेंबर,२००८.

५)शासन निर्णय क्रमांक पीडब्ल्यूएफ०२०९/प्र.क्र.१०७/पोल-७,दि.०६ फेब्रुवारी,२००९

६) शासन निर्णय क्र. संकीर्ण-०८०९/प्र.क्र-६१८/पोल-७, दि. ९. ऑक्टोबर, २००९

७) पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२८-अे/४९३७/नुकसान भरपाई/४७/२००८, दि. ९ ऑक्टोबर, २००९.

८) पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांचे पत्र क्र.डी-१२/ शहीद/ जखमी/अनुदान/२००९, दि.९ ऑक्टोबर, २००९.

९) शासन ज्ञापन, वित्त विभाग क्र.आकनि-११.०९/३८/अर्थसंकल्प-११, दि. १४.ऑक्टोबर,२००९.

**प्रस्तावना :-** दिनांक ८ ऑक्टोबर, २००९ रोजी गडचिरोली जिल्हयातील भामरागड तालुक्यातील लाहेरी जंगलाजवळ नक्षलवादी हल्ल्यात १७ पोलीस अधिकारी/कर्मचारी शहीद झाले असुन ४ पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत. सदर घटनेच्या अनुषंगाने शहीद व जखमी झालेल्या पोलीस अधिकारी / कर्मचा-यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान / नुकसान भरपाई देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**दिनांक ८ ऑक्टोबर, २००९ रोजी गडचिरोली जिल्हयातील भामरागड तालुक्यातील लाहेरी जंगलाजवळ नक्षलवादी हल्ल्यात १७ पोलीस अधिकारी/कर्मचारी शहीद झाले असुन ४ पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत. संदर्भ क्रमांक ५ येथील दि. ०६फेब्रुवारी, २००९ व संदर्भ क्र.६ येथील दि. ९ ऑक्टोबर, २००९ च्या शासन निर्णयान्वये नक्षलविरोधी कारवाई/नक्षलवादी हल्ल्यात शहिद झालेल्या पोलीसांच्या कुटुंबियांना विशेष मदत देण्याबाबत व इतर सवलतीबाबत शासन आदेश निर्गमित केलेला आहे. त्या अनुषंगाने उपरोक्त नक्षलविरोधी कारवाईत/नक्षलवादी हल्ल्यात मृत झालेल्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या कुटुंबियांना प्रत्येक मृत कर्मचाऱ्यामागे रु.२५,००,०००/- लक्ष याप्रमाणे मृत झालेल्या १७ पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या कुटुंबियाकरीता रु. ४,२५,००,०००/- व जखमी पोलीस कर्मचा-यांना प्रत्येकी रु. २ लक्ष याप्रमाणे ४ जखमी पोलीस कर्मचा-यांना रु ८ लक्ष असे एकूण रु. ४,३३,००,०००/- (रुपये चार कोटी तेहतीस लक्ष फक्त) इतक्या रकमेचे सानुग्रह अनुदान /नुकसान भरपाई मंजूर करण्यात येत आहे. शहीद व जखमी झालेल्या पोलीस अधिकारी / कर्मचारी यांची यादी व त्यांना/ त्यांच्या कुटुंबियांना द्यावयाच्या सानुग्रह अनुदान / नुकसान भरपाई च्या रकमेचा तपशिल सोबतच्या **प्रपत्र "अ"** मध्ये देण्यात आला आहे.

| अ.क्र. | नियंत्रण अधिकारी | लेखाशीर्ष |
|---|---|---|
| १) | पोलीस अधिक्षक, गडचिरोली (रु ४.३३ कोटी) | १)मुख्य लेखाशीर्ष "२०५५- पोलीस" अंतर्गत लेखाशीर्ष "(००) ११३-पोलीस कर्मचारी वर्ग यांचे कल्याण (००) (०४) कर्तव्य बजावीत असतांना जखमी अथवा मृत झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना व त्यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान (२०५५ ०२९३) योजनेतर ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर)" |

२. यासाठी होणारा खर्च मुख्य लेखाशीर्ष "२०५५- पोलीस" अंतर्गत लेखाशीर्ष "(००)११३-पोलीस कर्मचारी वर्ग यांचे कल्याण (००) (०४) कर्तव्य बजावीत असतांना जखमी अथवा मृत झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना व त्यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान (२०५५ ०२९३) योजनेतर ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर)" या लेखाशिर्षाखाली प्रथमतः शासन ज्ञापन वित्त विभाग क्र. आकनि- ११.०९/३८/अर्थसंकल्प-११, दि.१४.१०.२००९ अन्वये मंजुर करण्यात आलेल्या रु.४.३३ कोटी ( रु. चार कोटी तेहतीस लक्ष फक्त) इतक्या रकमेच्या आकस्मिकता निधी अग्रीमातुन भागविण्यात यावा.

३. या संबंधीचे देयके कोषागारात सादर करतांना त्यावर लाल शाईने" सदर खर्च आकस्मिकता निधीतून करण्यात आला आहे." अशी नोंद घेण्यात यावी व सदर प्रकरणी पूरक अनुदान प्राप्त झाल्यावर ती मागणी बी-१ मुख्य लेखाशीर्ष "२०५५- पोलीस" अंतर्गत लेखाशीर्ष "(००) ११३-पोलीस कर्मचारी वर्ग यांचे कल्याण (००) (०४) कर्तव्य बजावीत असतांना जखमी अथवा मृत झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना व त्यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान (२०५५ ०२९३) योजनेतर,३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर)" या लेखाशीर्षाखाली अंतिमतः खर्ची टाकण्यात यावी. रु.४.३३ कोटी (रुपये चार कोटी तेहतीस लक्ष फक्त) मंजूर केलेला अग्रिम हा पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना सानुग्रह अनुदान/ नुकसान भरपाई देण्याकरिता आहे.

४. पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांनी वरील मंजुरीप्रमाणे आकस्मिकता निधी अग्रिम रकमेतून खर्च करण्यासाठी देयके सादर करण्या संदर्भात पुढील सूचना काटेकोरपणे पाळण्याबाबत संबधितांना कळवावे.

(एक) आकस्मिकता निधीतून खर्च करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडे रक्कम सुपूर्द करण्यासंबंधीच्या आदेशात आगाऊ रक्कमेतून खर्च करतांना सादर करण्यात येणाऱ्या देयकावर "आकस्मिकता निधी अग्रिम, शासन ज्ञापन वित्त विभाग क्रमांक:आकनि-११.०९/३८/अर्थसंकल्प-११ दिनांक १४.१०.२००९, संगणक सांकेतांक ८००० ४८९८ अन्वये मंजूर" असे लाल शाईने लिहावे, अशी सूचना आदेशात अंतर्भूत करावी व ही सूचना लाल शाईने अधोरेखित करावी.

(दोन) आकस्मिकता निधी अग्रिम रकमेतून खर्च करण्यासाठी वेगळी देयके सादर करावीत.

(तीन) देयकावर जोडलेल्या संगणक चिठ्ठीवर अर्थसंकल्प शीर्षाचा कोड नंबर लिहिण्यात यावा.

(चार) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. सीएनएफ-१०८३/१४०/अर्थसंकल्प-३ , दि. २६ एप्रिल, १९८६ व ज्ञापन परिपत्रक वित्त विभाग क्र.सीएनएफ-१०८६/१५३/अर्थसंकल्प-३, दिनांक २८ ऑगस्ट, १९८६ अन्वये आकस्मिकता निधीमधील आगाऊ रकमेबाबत दिलेल्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करावे.

(पाच) आकस्मिकता निधी अग्रिमातून करावयाच्या खर्चासंबंधी देयके काढतांना संगणक संकेतांकाचा वापर करावा.

५. पोलीस अधिक्षक,गडचिरोली यांनी वरील मंजुरीप्रमाणे आकस्मिकता निधी अग्रिम खर्च करतांना ज्या कारणासाठी तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याच कारणासाठी पूर्णपणे खर्च करावी. ते याकरिता पूर्ण जबाबदार

राहतील. तसेच सदरहू अग्रिमातून प्रत्यक्ष खर्च केल्याची माहिती त्यांनी शासनास दिनांक ३०.११.२००९ पूर्वी अवगत करावी.

पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांनी त्यांना मंजूर करण्यात आलेला निधी संबंधित मृत कर्मचारी विवाहीत असल्यास त्याची पत्नी, मुले वा सावत्र मुले आणि दत्तक मुले, अविवाहीत मुली, सावत्र व दत्तक मुली यांच्या नावे स्वतंत्र खाती काढून समप्रमाणात मुदत ठेवींवर जमा करावेत. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन)नियम, १९८२ मधील कलम ११२ अन्वये प्रदान करण्यात येणा-या उपदानाप्रमाणे जर वरील पैकी त्यांच्या कुटुंबातील एकही व्यक्ती हयात नसतील तर विधवा मुली (सावत्र दत्तक मुली), आई, वडील, १८ वर्षांखालील भाऊ यात सावत्र भाऊ अविवाहीत बहिण, विधवा बहिण यात सावत्र बहीणीही तसेच विवाहीत मुली आणि पुर्वी मृत्यु पावलेल्या मुलांचे अपत्य एक किंवा त्याहून अधिक व्यक्ती हयात असतील तर अशा सर्व व्यक्तींना समान हिश्यात मुदत ठेवीवर जमा कराव्यात व व्याजाकरिता त्यांची वैयक्तिक स्वतंत्र खाती काढण्यात यावीत. जेणेकरुन मुदत ठेवीवरील व्याज संबधितांना उपलब्ध होऊ शकेल. या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्यात यावी व तसे शासनास अवगत करावे.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४८५/०९/व्यय-७, दिनांक :-९.१०.२००९ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( सु.बा.तुंबारे )
कार्यासन अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति,

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
पोलीस अधिक्षक, गडचिरोली
महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), मुंबई (प्रत्येकी पाच जादा प्रतींसह)
महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), नागपूर (प्रत्येकी पाच जादा प्रतींसह)
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई. (दोन जादा प्रतींसह)
सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई-३२ (दोन जादा प्रतींसह)
जिल्हा व कोषागार अधिकारी, गडचिरोली.
वित्त विभाग/अर्थसंकल्प-३/अर्थसंकल्प-१०/व्यय-७
गृह विभाग (बीयुडी-१)
निवड नस्ती (कार्यासन पोल-७)

शासन निर्णय गृह विभाग क्र.पीडब्ल्युएफ-१००९/प्र.क्र-७३३/पोल-७ दि. १५ ऑक्टोंबर,२००९

सोबतचे प्रपत्र-"अ"

(१) दि. ८ ऑक्टोंबर, २००९ रोजी गडचिरोली जिल्ह्यात नक्षलवादी हल्ल्यात शहीद झालेल्या पोलीस अधिकारी / कर्मचा-यांच्या कुटुंबियांना मंजुर सानुग्रह अनुदानाचा तपशिल.

| अ.क्र | नाव | पद | मंजुर रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | चंद्रशेखर संजय देशमुख | पोलीस उपनिरीक्षक | २५.०० लक्ष |
| २ | धनंजय बाजीराव धोटे | पोशि/३१९ | २५.०० लक्ष |
| ३ | रवी शिवय्या चौधरी | पोशि/ १६३४ | २५.०० लक्ष |
| ४ | मिर्लांद सुनिल संगारी | पोशि/२५५२ | २५.०० लक्ष |
| ५ | जितेंद्र येडवाजी वाघमारे | पोशि/२५६३ | २५.०० लक्ष |
| ६ | दिलीप भिकमचंद प्रवार | पोशि/२८६७ | २५.०० लक्ष |
| ७ | शंकर बुधाजी आत्राम | पोशि/ ११३२ | २५.०० लक्ष |
| ८ | प्रकाश रमेश बासनवार | पोशि/ १४६४ | २५.०० लक्ष |
| ९ | विजय भाऊराव कुमरे | पोशि / ४२४ | २५.०० लक्ष |
| १० | तुमनलाल पतीराम बढाई | पोशि / २६९६ | २५.०० लक्ष |
| ११ | शेषराव महादेव सर्वे | पोशि/ २७२७ | २५.०० लक्ष |
| १२ | झुरु केये परसा | पोशि / २६३४ | २५.०० लक्ष |
| १३ | रमेश मुत्यालु कोंडागुले | पोशि / २८३९ | २५.०० लक्ष |
| १४ | सहादु देवू पुंगाटी | पोशि / ३०५४ | २५.०० लक्ष |
| १५ | सुरेश झुरु आतलामी | पोशि / ३०१३ | २५.०० लक्ष |
| १६ | सोमजी दोंगे पुगांटी | पोशि / ३०४५ | २५.०० लक्ष |
| १७ | नरुद्दीन मोईनुद्दीन हकीम | पोशि / २५२२ | २५.०० लक्ष |
|  |  | एकूण :- | ४,२५,००,०००/- |

(२) दि. ८ ऑक्टोंबर, २००९ रोजी गडचिरोली जिल्ह्यात नक्षलवादी हल्ल्यात जखमी झालेल्या कर्मचा-यांना मंजुर नुकसान भरपाई रक्कमेचा तपशिल.

| अ.क्र | नाव | पद | मंजुर रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | लालु विजय पल्लो | पोशि / ७११ | २.०० लक्ष |
| २ | गजेंद्र सदाशिव सय्याम | पोशि / २६३१ | २.०० लक्ष |
| ३ | उमेश मुकुंदा आलाम | पोशि / २७५० | २.०० लक्ष |
| ४ | मुन्शी मासा मडावी | पोशि / ३०२९ | २.०० लक्ष |
|  |  | एकूण :- | ८.०० लक्ष |

दि.०४.१०.२०१० रोजी पेरमिली नक्षलवादी हल्ल्यात मृत झालेले पोलीस उपनिरीक्षक दिवंगत शशिकांत तुकाराम मोरे व महेंद्र सुदाम नालकुल यांच्या कुटुंबियांना विशेष मदत व इतर सवलती देण्याबाबत

## महाराष्ट्र शासन
## गृह विभाग

शासन निर्णय क्रमांक:- पीडब्ल्यूएफ १०१०/प्र.क्र.५८१/पोल-७,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक:-०१ नोव्हेंबर, २०१०

वाचा :-१) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक-पीडब्ल्यूएफ-०८०९/प्र.क्र.६३८ /पोल-७, दिनांक ९ ऑक्टोबर, २००९

२) शासननिर्णय, महसूल व वन विभाग(मदतवपुनर्वसन) ,क्रं-डिएमयु- २००८/ प्र.क्र.३९९/डीएम-१, दि.१ डिसेंबर, २००८.

३) पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांचे क्र. डी-१२ /जखमी/ अनुदान/ २५६७-१३७० /२०१०, दि. ५.१०.२०१०

<u>प्रस्तावना :-</u> नक्षलविरोधी कारवाईत/नक्षलवादी हल्ल्यात मृत झालेल्या पोलीस अधिकारी यांच्या कुटुंबियांना संदर्भ क्र१ येथील शासन निर्णयान्वये रु.२५.०० लक्ष सानुग्रह अनुदान देण्याची तरतुद करण्यात आलेली आहे. तद्नूषंगाने दि.०४.१०.२०१० रोजी गडचिरोली जिल्हयातील पेरमिली येथे नक्षलवाद्यांनी घडविलेल्या भू-सुरुंग स्फोटात शहिद झालेल्या दिवंगत शशिकांत तुकाराम मोरे व महेंद्र सुदाम नालकुल या दोन पोलीस उपनिरीक्षकांच्या कुटुंबियांना शासन निर्णयातील तरतूदीन्वये प्रत्येकी रु.२५.०० लाख सानुग्रह अनुदान देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u> दि.०४.१०.२०१० रोजी गडचिरोली जिल्हयातील पेरमिली येथे नक्षलवाद्यानी घडविलेल्या भू-सुरुंग स्फोटात शशिकांत तुकाराम मोरे व महेंद्र सुदाम नालकुल हे दोन पोलीस उपनिरीक्षक शहिद झालेले आहेत. सदर शहिद झालेल्या पोलीस अधिकारी यांच्या कुटुंबियांना प्रत्येकी रु.२५.०० लक्ष याप्रमाणे एकूण रु.५० लक्ष इतक्या रकमेचे सानुग्रह अनुदान प्रस्तुत शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात येत आहे.

२. याबाबतचा खर्च "२०५५-पोलीस, (००) ११३, पोलीस कर्मचारी वर्ग यांचे कल्याण-(००) (०४) कर्तव्य बजावित असतांना जखमी झालेल्य पोलीसांना व मृत पावलेल्या पोलीस

कर्मचा-यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान (२०५५ ०२९३) ३१ सहाय्यक अनुदानें (वेतनेत्तर)" या लेखाशिर्षाखाली सन २०१०-११ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. पोलीस अधिक्षक गडचिरोली यांनी मंजूर करण्यात आलेला निधी संबंधीत मृत कर्मचारी विवाहीत असल्यास त्याची पत्नी मुलें वा सावत्र मुले आणि दत्तक मुले, अविवाहीत मुली,सावत्र व दत्तक मुली यांच्या नावे स्वतंत्र खाती काढून समप्रमाणात मुदत ठेवीवर जमा करावेत. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील कलम ११२ अन्वये प्रदान करण्यात येणा-या उपदानाप्रमाणे जर वरील पैकी त्यांच्या कुटुंबातील एकही व्यक्ती हयात नसतील तर विधवा मुली (सावत्र, दत्तक मुली), आई वडील, १८ वर्षाखालील भाऊ, सावत्र भाऊ, अविवाहीत बहीण, विधवा बहीण यात सावत्र बहिणी तसेच विवाहीत मुली आणि पूर्वी मृत्यु पावलेल्या मुलांचे अपत्य एक किंवा त्याहुन अधिक व्यक्ती हयात असतील तर अशा सर्व व्यक्तींना समान हिश्यात मुदत ठेवीवर जमा कराव्यात व व्याजाकरिता त्यांची वैयक्तिक स्वतंत्र खाती उघडावीत जेणेकरुन मुदत ठेवीवरील व्याज संबंधितांना उपलब्ध होऊ शकेल. या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.४०३/१०/व्यय-७ दि.६.१०.२०१० अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(भि.रा.वाढवे)
सह सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति,

पोलीस महासंचालक, महराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली.
पोलीस अधिक्षक, गडचिरोली
महालेखापाल-१, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
महालेखापाल-२, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सह सचिव अर्थसंकल्प,गृह विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
जिल्हा कोषागार अधिकारी, गडचिरोली.
वित्त विभाग (व्यय-७/अर्थसंकल्प-१०),मंत्रालय मुंबई-३२.
पीयुडी-१ कार्यासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
निवड नस्ती (पोल-७).

---

दिनांक १.२.२००९, ६.४.२००९, २१.५.२००९, दि. ८.१०.२००९ व दि.४.१०.२०१० रोजी नक्षली हल्ल्यात शहीद झालेल्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या कुटुंबियांना मोफत सदनिकेऐवजी रोख रक्कम देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**

शासन निर्णय क्र.पीडब्ल्युएफ ०२०९/प्र.क्र-११०/पोल-७
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २९ मार्च, २०११

**संदर्भ :-**

१) शासन निर्णय, गृह विभाग क्रमांक पीडब्ल्यएफ ०२०९/प्र.क्र-११०/पोल-७, दि. ९ मार्च, २००९

२) शासन निर्णय, गृह विभाग,क्रमांक पीडब्ल्युएफ-०५०९/प्र.क्र-२९६/पोल-७ दि. ३ जुलै, २००९

३) शासन निर्णय,गृह विभागक्रमांक पीडब्ल्युएफ १००९/प्र.क्र-७३३/पोल-७, दि. १५ ऑक्टोबर, २००९

४) शासन निर्णय, गृह विभाग क्रमांक पीडब्ल्युएफ ०२०९/प्र.क्र-१०७/पोल-७, दि. ६ फेब्रुवारी, २००९

**प्रस्तावना :-** दि. १.२.२००९ रोजी मरकेगांव जि. गडचिरोली, दि. ६.४.२००९ रोजी मुंगनेर परिसरातील जंगल जि. गडचिरोली, दि. २१.५.२००९ हत्तीगोटा जंगल परिसर जि, गडचिरोली, दि. ८.१०.२००९ रोजी लाहेरी जंगल जि. गडचिरोली, दि. ४.१०.२०१० रोजी मौजे पेरमिली जि,गडचिरोली येथे नक्षलवादी हल्ल्यात एकूण ५३ पोलीस अधिकारी/कर्मचारी शहीद झालेले आहेत. सदर शहीदांच्या कुटुंबियांना संदर्भिय क्र. ४ येथील शासन निर्णय दि. ६.२.२००९ अन्वये मोफत सदनिकेऐवजी रोख रक्कम देण्याचे विचाराधीन होते.

**शासन निर्णय :-** उपरोक्त प्रस्तावनेत नमूद केलेल्या एकूण ५३ शहीदांच्या कुटुंबियांना संदर्भिय क्र. ४ येथील शासन निर्णयानुसार मोफत सदनिका अथवा सदनिकेऐवजी रोख रक्कम देण्याबाबतची तरतूद करण्यात आलेली आहे. सदर ५३ शहीदांच्या कुंटुंबियांना अनुज्ञेय क्षेत्रफळा इतक्या सदनिका त्यांच्या निवासी जिल्ह्यात उपलब्ध नसल्यामुळे त्यांना सदनिकेऐवजी रोख रक्कम देणे आवश्यक आहे म्हणून या शासन निर्णयासोबतच्या 'परिशिष्ट अ ' मध्ये नमूद केल्याप्रमाणे एकूण ५३ शहीदांच्या कुटुंबियांना मोफत सदनिकेऐवजी रोख रक्कम देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

या प्रयोजनार्थ आवश्यक रक्कम रु. १२०७.५० लक्ष (रुपये बारा कोटी सात लक्ष पन्नास हजार फक्त) उपलब्ध करण्यात येत आहे. यावर होणारा खर्च मागणी क्र.बी-१ मुख्य लेखाशिर्ष "२०५५- पोलीस, (००) ११३ पोलीस कर्मचारी वर्ग यांचे कल्याण (००)(०४) कर्तव्य बजावित असतांना जखमी अथवा मृत

झालेल्या पोलीस कर्मचा-यांना व त्यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान (२०५५०२९३) योजनेत्तर ३१ सहाय्यक अनुदाने-वेतनेत्तर " या लेखाशिर्षाखाली सन २०१०-११ या वर्षासाठी मंजूर असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

सदर रक्कम अधिदान व लेखा कार्यालयातून आहरित करण्याच्या प्रयोजनार्थ पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयातील विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन) यांना नियंत्रक अधिकारी तसेच त्यांच्या कार्यालयातील उप सहायक पोलीस महानिरीक्षक (लेखा) यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर रक्कम चालू वित्तीय वर्ष संपण्यापूर्वी खर्ची पडेल याबाबत दक्षता घेण्यात यावी.

सदर खर्चाची बाब विधानमंडळास बाब क्र. १५ अन्वये लाक्षणिक पुरवणी मागणीव्दारे निदर्शनास आणण्यात आली असून वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक पूरक - २०.११/प्र.क्र.५८/अर्थसंकल्प-३, दिनांक २८ मार्च, २०११ अन्वये सदर खर्चास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

**(युवराज अजेटराव)**
अवर सचिव, गृह विभाग

प्रति,

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली.
जिल्हाधिकारी, गडचिरोली.
पोलीस अधिक्षक, गडचिरोली.
महालेखापाल-१ महाराष्ट्र (लेखा परिक्षा/लेखा अनुज्ञेयता), मुंबई.
महालेखापाल-२ महाराष्ट्र (लेखा परिक्षा/लेखा अनुज्ञेयता), नागपूर
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहसचिव अर्थसंकल्प, गृह विभाग, मंत्रालय मुंबई-३२
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
वित्त विभाग (व्यय-७/अर्थसंकल्प-१०), मंत्रालय, मुंबई-३२
बीयुडी-१ कार्यासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
निवडनस्ती पोल-७

---------------

संदर्भ :- गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक पीडब्ल्युएफ - ०२०९/प्र.क्र.११०/पोल-७,
दिनांक २९ मार्च, २०११

## परिशिष्ट - 'अ'

| अ.क्र | घटना व दि. | नांव | पद | अनुज्ञेय क्षेत्रफळ | दर प्रति.चौ.फु. | एकूण देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| दि.१.२.२००९ रोजी मरकेगाव, जिल्हा गडचिरोली येथील नक्षली हल्ल्यातील शहिद. | | | | | | |
| १ | १/२/२००९ | उपेंद्र धनंजय गुळदेकर | पो.उप.नि. | ८०० चौ.फु. | ३००० चौ.फु. | २४,००,०००/- |
| २ | १/२/२००९ | कालीदास देवाजी हलामी | पो.हवा. | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| ३ | १/२/२००९ | सुरेंद्र रामभाऊ नैताम | पो.हवा. | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| ४ | १/२/२००९ | नानु उलगे तुलावी | पो.ना. | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| ५ | १/२/२००९ | बैसाखु जगतराम पडोटी | पो.ना. | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| ६ | १/२/२००९ | फागु लक्ष्मण कोराम | पो.ना. | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| ७ | १/२/२००९ | दुर्योधन सुकरुजी हलामी | पो.शि | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| ८ | १/२/२००९ | दिलीप नामदेव भानारकर | पो.शि | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| ९ | १/२/२००९ | रुपेश जनार्दन पेंदोर | पो.शि | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| १० | १/२/२००९ | भुषण शामलाल मोगरे | पो.शि | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| ११ | १/२/२००९ | सुधाकर तुळशिराम डोकरमारे | पो.शि | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| १२ | १/२/२००९ | माधव किसन पोटे | पो.शि | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| १३ | १/२/२००९ | रोहिदास दिनकर कुमरे | पो.शि | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| १४ | १/२/२००९ | मनोज बालाजी कलेपल्लीवार | पो.शि | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| १५ | १/२/२००९ | अमर नासर वडजकर | पो.शि | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **दि.६.४.२००९ रोजी धानोरा येथील मुंगनेर जंगल परिसर जिल्हा गडचिरोली येथील नक्षली हल्ल्यातील शहिद.** | | | | | | |
| १६ | ६/४/२००९ | गोपीचंद नारायण नैताम | पो.शि | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| १७ | ६/४/२००९ | ज्ञानेश्वर भगवान सेप | पो.शि | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| १८ | ६/४/२००९ | कालीदास रुषी वड्डे | पो.शि | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| **दि.२१.५.२००९ रोजी धानोरा पोलीस स्टेशनअंतर्गत हत्ती गोटा जगल परिसर जिल्हा गडचिरोली येथील नक्षली हल्ल्यातील शहिद.** | | | | | | |
| १९ | २१/५/२००९ | अशोक रामास्वामी अय्यर | पो.नि. | १००० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | ३०,००,०००/- |
| २० | २१/५/२००९ | शांताराम प्रतापराव घोरपडे | पोउप नि. | ८०० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २४,००,०००/- |
| २१ | २१/५/२००९ | भक्तदास वारलुजी शेट्टीवार | सफ्रौ. | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| २२ | २१/५/२००९ | हेमराज पतरुजी टेंभुणे | पो.हवा. | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| २३ | २१/५/२००९ | सुरेश अवसुजी किरंगे | पो.हवा. | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| २४ | २१/५/२००९ | काशिनाथ वासुदेव रोहणकर | चालक पो.ना. | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| २५ | २१/५/२००९ | गेंदकुवर चैनसिंह फरदिहा | महिला पो.ना. | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| २६ | २१/५/२००९ | मानिक नेहरुउसेंडी | पो.ना. | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| २७ | २१/५/२००९ | शकुंतला लच्चा आलाम | महिला पो.ना. | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| २८ | २१/५/२००९ | शोभा लिंगाजी ताडे | महिला पो.ना. | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २,२५०,०००<br>२२,५०,०००/- |
| २९ | २१/५/२००९ | दामोधर आत्माराम नैताम | पो.शि. | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| ३० | २१/५/२००९ | सदानंद वासुदेव मडावी | पो.शि | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| ३१ | २१/५/२००९ | संतोष बन्सी दुर्गे | पो.शि | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| ३२ | २१/५/२००९ | विलास वासुदेव मांदाडे | पो.शि | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| ३३ | २१/५/२००९ | अल्का बाजोजी गावडे | महिला पो.शि | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| ३४ | २१/५/२००९ | सुनिता बहादुजी कल्लो | महिला पो.शि | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |

D:\GAIKWAD SK/Myrtier Name list.lwp

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| दि.८.१०.२००९ रोजी लाहेरी जगल परिसर ता.भामरागड,जिल्हा गडचिरोली येथील नक्षली हल्ल्यातील शहिद. | | | | | | |
| ३५ | ८/१०/०९ | चंद्रशेखर संजय देशमुख | पो.उप.नि. | ८०० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २४,००,०००/- |
| ३६ | ८/१०/०९ | धनराज बाजीराव धोटे | पो.शि. | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| ३७ | ८/१०/०९ | रवी शिवय्या चौधरी | पो.शि. | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| ३८ | ८/१०/०९ | मिलींद सुनिल रंगारी | पो.शि. | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| ३९ | ८/१०/०९ ✓ | जितेंद्र येडवाजी वाघमारे | पो.शि. | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| ४० | ८/१०/०९ | दिलीप भिकमचंद पवार | पो.शि. | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| ४१ | ८/१०/०९ | शंकर बुधाजी आत्राम | पो.शि. | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| ४२ | ८/१०/०९ | प्रकाश रमेश बासनवार | पो.शि. | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| ४३ | ८/१०/०९ | विजय भाउराव कुमरे | पो.शि. | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| ४४ | ८/१०/०९ | तुमनलाल पतीराम बढाई | पो.शि. | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| ४५ | ८/१०/०९ ✓ | शेषराव महादेव सर्वे | पो.शि. | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| ४६ | ८/१०/०९ | झुरु केये परसा | पो.शि. | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| ४७ | ८/१०/०९ | रमेश मुत्यालु कोंडागुले | पो.शि. | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| ४८ | ८/१०/०९ | सहादू देवू पुंगाटी | पो.शि. | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| ४९ | ८/१०/०९ | सुरेश झुरु आतलामी | पो.शि. | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| ५० | ८/१०/०९ | सोमजी दोंगे पुंगाटी | पो.शि. | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| ५१ | ८/१०/०९ | नुरुद्दीन मोइनुद्दीन हकीम | पो.शि. | ७५० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २२,५०,०००/- |
| दि.४.१०.२०१० रोजी पेरमिली, जिल्हा गडचिरोली येथील नक्षलवाद्यांनी घडविलेल्या भू-सुरुंग स्फोटात झालेले शहिद. | | | | | | |
| ५२ | ४/१०/२०१० | शशिकांत तुकाराम मोरे | पो.उप नि. | ८०० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २४,००,०००/- |
| ५३ | ४/१०/२०१० | महेंद्र सुदाम नालकुल | पो.उप नि. | ८०० चॉ.फु. | ३००० चौ.फु. | २४,००,०००/- |